# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०८ जुलै, २०२४ / आषाढ १७, १९४६ (शके)**

**(१) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) उद्योग मंत्री**
**(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(७) महिला व बालविकास मंत्री**
**(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री**
**(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४४**

---

### मेहरुण (जि.जळगाव) येथील विभागीय क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) * २३०२४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील मेहरूण परिसरात ३६ एकर जागेवर विभागीय क्रीडा संकुलाच्या कामासाठी शासनाने रुपये २४० कोटींच्या खर्चास माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रकल्प व्यवस्थापनाचे काम करण्यासाठी कोणत्या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच अद्यापपर्यंत आंतरराष्ट्रीय निविदा प्रसिध्द करण्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील क्रीडा संकुलाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम व निविदा काढण्यास विलंब करण्याऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच क्रीडा संकुलाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) मौ. मेहरुण ता.जि.जळगांव येथील विभागीय क्रीडा संकुलासाठी रु. २४०५४.०० लक्ष एवढया अंदाजपत्रकास शासन निर्णय दिनांक १५/०९/२०२३ रोजीअन्वये मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) विभागीय क्रीडा संकुलाचे प्रकल्प व्यवस्थापनासाठी वास्तुविशारद शशी प्रभु आणि असोसिएट मुंबई यांची नियुक्ती नोव्हेंबर, २०२३ मध्ये करण्यात आली असून त्यांनी बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून ते सा.बां.विभाग, जळगांव यांच्या तांत्रिक मान्यतेनंतर दिनांक १४/३/२०२४ रोजी मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे,

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गतच्या स्मार्ट अंगणवाडी कार्यक्रमात अनियमितता झाल्याबाबत

**(२) * २३४११ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून एकात्मिक बालविकास सेवा योजना सुरु असून स्मार्ट अंगणवाडी प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येऊनही भंडारा जिल्ह्यात डिजीटल शिक्षण, शुध्द पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने अनेक स्मार्ट अंगणवाड्या केवळ कागदोपत्री असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडीतील शुन्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना पोषणमुक्त आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, पूर्व प्राथमिक शिक्षण केंद्रातून देण्यासाठी या अंगणवाड्यांची स्थिती सुधारण्यासाठी शासनाने आदर्श अंगणवाडीची घोषणा करूनही अद्याप या अंगणवाड्यांकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्मार्ट अंगणवाडी प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही,

राज्य शासनामार्फत स्मार्ट अंगणवाडी योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. भंडारा जिल्ह्यामध्ये ग्रामीण व नागरी क्षेत्रात १४१७ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्यापैकी स्वमालकीच्या इमारतीत १२४८ अंगणवाडी केंद्रे आहेत. सदर योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये ग्रामीण क्षेत्रातील स्वमालकीच्या इमारतीतील ७४५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात आले आहे. उर्वरित ५०३ अंगणवाडी केंद्रांचे टप्प्या-टप्प्याने स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात येईल.

(२) व (३) हे खरे नाही.

राज्य शासनामार्फत स्मार्ट अंगणवाडी केंद्र योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येत आहे. सन २०१९-२० ते २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील एकूण ११०५५६ अंगणवाडी केंद्रांपैकी ७२३७९ अंगणवाडी केंद्रे स्वमालकीच्या इमारतीमध्ये असून त्यापैकी १६८८५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात आले आहे. उर्वरित स्वमालकीच्या इमारतीतील अंगणवाडी केंद्रांचे टप्प्या-टप्प्याने स्मार्ट अंगणवाडी केंद्रात रुपांतर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेवस बंदर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे प्रवासी जेट्टीचे नूतनीकरण करण्याबाबत

**(३)** * **२३२४७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवस (ता.अलिबाग) येथील रेवस बंदर ते भाऊचा धक्का (मुंबई) ह्या ७५ वर्षाहून अधिक काळ सुरु असलेल्या प्रवासी बोटींची सेवा नोकरदार, व्यापारी आणि पर्यटक असे हजारो प्रवासी नियमित लाभ घेत असून रेवस बंदर येथे क्रेन द्वारे चिखल काढण्याचे काम सुरू असल्याने ओहोटीच्या वेळी सदर प्रवासी बोट जेट्टीला लावण्यात अडचणी निर्माण होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेवस बंदर किनाऱ्यातील चिखल तसेच गाळ काढून याठिकाणी प्रवासी जेट्टीचे नूतनीकरण करण्याबाबत तसेच ओहोटीच्या वेळी किनाऱ्यावर जास्त चिखल येऊ नये यासाठी सदर जेट्टीला अत्याधुनिक यंत्रणा चायनल बसविण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील जल जीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४)** * **२३३०० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध धरणांमधून मुंबई, वसई-विरार व मीरा-भाईंदर या भागात पाणीपुरवठा होत असताना तसेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत असताना जिल्ह्याच्या आदिवासी दुर्गम भागात दरवर्षी फेब्रुवारी पासूनच पाणीटंचाई निर्माण होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी अनेक भागांमध्ये जल जीवन मिशनची कामे विविध कारणांमुळे अपूर्ण असून, सदर कामे पूर्ण करण्याकरीता शासनाकडून कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसून पालघर जिल्ह्याची सन २०१४ मध्ये निर्मिती होऊन सुध्दा अनेक मूलभूत प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात दरवर्षी निर्माण होणारी भीषण पाणी टंचाई टाळण्याकरीता जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड व वाडा तालुका भौगोलिकदृष्टया अति दुर्गम क्षेत्रात वसलेला असून, भुपृष्ठ खडकाळ असल्याने काही भागातील पाणी धारण क्षमता अत्यंत अल्प असल्यामुळे फेब्रुवारी महिन्यापासून भुजल पातळी खाली जाते. त्यामुळे पाणी टंचाईची समस्या निर्माण होते.
(२) पालघर जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत ५६२ पाणीपुरवठा योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत २६ अशा एकूण ५८८ योजना घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी ७५ योजनांची कामे पूर्ण झालेली असून, ५१३ योजनांची कामे प्रगतीपथावर आहे. सदर कामे सन २०२४ अखेर पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
(३) पालघर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गाव / पाड्यांच्या पाणी टंचाई समस्येचे निवारण करणेकरीता टंचाई आराखडा मंजूर करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील टंचाई कायमस्वरुपी दुर करण्याकरीता जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची कामे प्रगतीपथावर असून, सदर कामे विहीत वेळेत पूर्ण व्हावीत याकरीता विविध स्तरावरुन आयोजित बैठकांव्दारे नियमित आढावा व पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परिचारिका प्रशिक्षण केंद्र (जि.अकोला) येथील प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनींना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत

**(५) * २३५३२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील परिचारिका (नर्सिंग) प्रशिक्षण केंद्रातील १४ विद्यार्थीना अन्नातून विषबाधा झाली असून, त्यापैंकी २ विद्यार्थीनींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर उपचार सुरु असल्याची घटना दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासकीय महाविद्यालयाच्या अधिक्षकांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच विषबाधा झालेल्या विद्यार्थीनींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) दिनांक १९/०४/२०२४ रोजी अकोला जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील परिचारिका (नर्सिंग) प्रशिक्षण केंद्रातील १४ विद्यार्थीनींना अन्नातून विषबाधा झाल्या प्रकरणी वैद्यकीय अधीक्षक, अकोला यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्य चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार विद्यार्थीनींमार्फत चालविण्यात येत असलेली co-operative मेस बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून डॉक्टर्स विद्यार्थ्यांच्या मेस मधून डबे लावण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जांभुळ शुध्दीकरण केंद्र (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथे विजेचा धक्का लागून मृत्यूमुखी पडलेल्या व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(६) * २३००३ श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जांभूळ जलशुद्धीकरण (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) केंद्रामध्ये पाण्याची टाकी बांधण्याचे काम सुरू असताना विजेचा धक्का लागून तीन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची आणि दोन कामगार जखमी झाले असल्याची घटना दिनांक ४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामगारांना पुरेशी सुरक्षात्मक साधन-सामुग्री पुरविण्यात आलेली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या नातेवाईकांना तसेच जखमी कामगारांना तातडीने नुकसानभरपाईची रक्कम अदा करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत जांभूळ जलशुध्दीकरण केंद्र, एम.आय.डी.सी., ता.कल्याण, जि.ठाणे येथे दिनांक ०४/०४/२०२४ रोजी टाकीचे बांधकाम सुरु असताना सबमर्सीबल पंपाचा पाईप निघाल्याने तो पाईप जोडतेवेळी इलेक्ट्रीक धक्का लागून तीन कामगारांचा मृत्यू झाला असून ०१ कामगार जखमी झाला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) विद्युत निरीक्षक, निरीक्षण विभाग क्र. २, ठाणे यांचेकडून प्राप्त माहितीनुसार एम.सी.बी. मध्ये बिघाड होवून कामगारांना विजेचा धक्का लागल्याने सदर अपघात झालेला असून त्यासंदर्भात सदर अपघाताशी संबंधित कंत्राटदार यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०२४९/२०२४, दिनांक २९/०४/२०२४ रोजी कल्याण तालुका पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल झालेला आहे.

मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कल्याण यांचे न्यायालयात किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत कंत्राटदाराविरुध्द फौजदारी खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच सदर अपघाताच्या ठिकाणी सुरक्षेविषयक उपाययोजनांची पूर्तता होईपर्यंत सदरील बांधकामास महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ च्या नियम २६३ अन्वये दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये बांधकामास कामबंद/मनाई आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

(४) मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांच्या कार्यालयास दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत मयत कामगाराच्या वारसास तातडीची मदत म्हणून प्रत्येकी रुपये ५.०० लक्ष रुपये एवढी रक्कम ठेकेदारामार्फत आदा करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बाबरगाव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शिवना नदीवरील पुलाचे बांधकाम करणेबाबत

**(७) * २३०६१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबरगांव (ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शिवना नदीवर बंधाऱ्याचे काम झाले असूनही बॅक वाटर मोठ्या प्रमाणावर येत असून बाबरगांव ते भोयगांव येथे नदीची लांबी किमान १०० मीटर असल्याने सदर रस्ता बॅक वाटरमुळे १० फुट खोल पूर्ण पाण्याखाली जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता पाण्याखाली जात असल्याने भोयगांव, कोबापूर, पदमपुर, कनकोरी, नारायणपुर, पेंडापूर, दिघी, काळेगांव येथील नागरिक व कामगार तसेच विद्यार्थ्यांना १५ कि.मी. वळसा घालून बाबरगांव येथे जावे लागत असून, बाबरगांव येथे शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन पाण्यातून ये-जा करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी पुलाचे बांधकाम करणेसाठी मागील १० वर्षांपासून परिसरातील नागरिकांनी मागणी केली असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बाबरगांव येथील शिवना नदीवर पुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) बाबरगाव ते भोयगाव रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८८ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या सा.क्र.०/१९० मध्ये शिवना नदीवर बंधारा अस्तित्वात आहे. पावसाळयात सदर बंधाऱ्यावर बॅक वॉटरचे पाणी जमा होत असल्याने सदर रस्ता सुमारे १० फुट पाण्याखाली जातो. त्यामुळे पावसाळयात तेथील नागरीकांना व विद्यार्थ्यांना १५.०० कि.मी. लांबीच्या पर्यायी मार्गाने ये-जा करावे लागते. यास्तव सदर ठिकाणी मोठा पूल बांधणे आवश्यक आहे. तथापि, ग्रामविकास विभागाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यावरील कामांकरीता भूसंपादनाची तरतूद नाही. त्यामुळे सदर ठिकाणी मोठा पूल बांधावयाचा झाल्यास त्याकरीता खाजगी मालकीच्या जमिनीची आवश्यकता असून स्थानिक शेतकऱ्यांकडून जमीन उपलब्ध होण्यासाठी त्यांची संमती मिळवण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेकडून सुरु आहे. शेतकऱ्यांकडून दानपत्राद्वारे जमीन उपलब्ध झाल्यानंतर सदर मोठ्या पुलाचे काम नाबार्ड योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास प्रस्ताव पाठविण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील बनपुरी येथे आरोग्य उपकेंद्र आणि झरे व शेटफळे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत

**(८) * २३३४३ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनपुरी (ता.आटपाडी, जि.सांगली) गावातील लोकसंख्येत वाढ झाल्यामुळे सदर ठिकाणी रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी आरोग्य उपकेंद्राची उभारणी करण्याबाबत तसेच झरे व शेटफळे (ता.आटपाडी, जि.सांगली) या गावांचीही लोकसंख्या वाढल्यामुळे या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ तसेच माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आटपाडी तालुक्यातील बनपुरी येथे उपकेंद्र तसेच झरे व शेटफळे येथे प्राथमिक आरोग्य केंद्रास खास बाब म्हणून मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याचीही मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाकडे अनेकवेळा मागणी करुनही कोणतीही कार्यवाही होत नसल्याने उपकेंद्र तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राअभावी रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बनपुरी येथे उपकेंद्र व झरे व शेटफळे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांचे मागणीनुसार जिल्हास्तरावरुन परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात आला. तसेच मौजे झरे व शेटफळे येथे उपकेंद्र कार्यरत असून त्यामार्फत जनतेस आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. तसेच मौजे बनपुरी येथील जनतेस नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
(४) आरोग्य सेवा, आयुक्तालयामार्फत दिनांक २७/०५/२०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव निकषांनुसार तपासून सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ विकास प्राधिकरण निर्मिती व विकास आराखड्यास मान्यता देणेबाबत

**(९) * २३३०४ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोरणमाळ (जि.नंदुरबार) येथील पर्यटन विकास प्राधिकरण निर्मितीची घोषणा करण्यात आली असून त्याकरीता जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी विकास आराखडा तसेच पर्यटन प्राधिकरण निर्मितीसाठी रुपये ५०,३५०/- लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठीचा प्रस्ताव सन २०२१ मध्ये शासनास सादर केला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी सादर केलेल्या पर्यटन प्राधिकरण निर्मिती प्रस्तावास व विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय असून तोरणमाळ (जि.नंदुरबार) पर्यटन विकास आराखड्यास मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

तोरणमाळ विकास प्राधिकरणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल जिल्हाधिकारी नंदुरबार यांनी दिनांक ०२/०९/२०२३ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता.त्यानुषंगाने प्रकल्प अहवालातील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत पर्यटन संचालनालयामार्फत जिल्हाधिकारी, नंदुरबार यांना दिनांक ०७/०६/२०२४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(२) व (३) पर्यटन संचालनालयाने दिनांक ०७/०६/२०२४ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी नंदुरबार यांना कळविल्यानुसार त्रुटींचे निराकरण करुन प्रस्ताव सादर झाल्यावर आराखड्याच्या मंजुरी बाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बेकायदेशीर नर्सिंग होम विरोधात कारवाई करण्यासाठी स्वतंत्र कायदा तयार करण्याबाबत

**(१०) * २३८५१ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेकायदा नर्सिंग होम विरोधात कारवाई करण्यासाठी केंद्र शासनाने क्लिनिकल आस्थापना कायदा लागू केलेला असताना राज्यात या कायद्याची अद्याप अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कायदा राज्यात लागू न करण्याची कारणे काय आहेत तसेच राज्यातील बेकायदा नर्सिग होम विरोधात स्वतंत्र कायदा तयार करण्याचे राज्य शासनाने २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्य शासनाने स्वतंत्र कायद्याची निर्मिती न केल्याने सद्य:स्थितीत राज्यातील बेकायदा नर्सिंग होमवर सन १९४९ च्या बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्टखाली नाममात्र कारवाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील बेकायदा नर्सिंग होमविरोधात स्वतंत्र कायदा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
केंद्र शासनाचा क्लिनिकल आस्थापना अधिनियम राज्यात लागू करण्यात आलेला नाही, हे खरे असले तरी केंद्र शासनाचा कायदा लागू होण्याच्या पूर्वीपासून महाराष्ट्रात महाराष्ट्र शुश्रूषा-गृह नोंदणी अधिनियम लागू आहे.
(२) राज्यात महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ लागू आहे. हा अधिनियम व त्याखाली तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी नियम १९७३ व महाराष्ट्र शुश्रूषा गृह नोंदणी(सुधारित) नियम, २०२१ या नियमातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील एनसीसी मुख्यालयांतर्गत एअर विंग एनसीसी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत.

**(११) * २३७६५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९७४६ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे सन १९६० पासून सुरु असलेल्या एनसीसी मुख्यालयात केवळ आर्मी व नेव्हीचा अभ्यासक्रम शिकविला जात असून विद्यार्थ्यांसाठी एअर फोर्सचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी गत ७ ते ८ वर्षांपासून एनसीसीकडून एअर विंगची मागणी होत असून सदर जागा मिळणेसाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, नवी दिल्ली यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्मरणपत्राच्या अनुषंगाने प्राधिकरणास जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता देण्यात येऊन सदर अभ्यासक्रम केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी भारतीय विमान प्राधिकरण यांनी जागा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करणे तसेच एअर विंग एनसीसीचे अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) याबाबत राष्ट्रीय छात्र सेना, महासंचालनालय, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय छात्र सेना संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे. सदर हवाई प्रशिक्षण केंद्रासाठी भारतीय विमान प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी जमिनीचे तात्पुरते वाटप केले आहे. सदर जमिनीचा ताबा मिळाल्यावर व तेथे उड्डाण प्रशिक्षणाकरीता आवश्यक मान्यतेबाबत कार्यवाही पूर्ण झाल्यावर अभ्यासक्रम सुरु करता येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## महाड (ता.महाड जि.रायगड) ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * २३५४७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (ता.महाड जि.रायगड) येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय तसेच मौजे केंबुर्ली (ता.महाड, जि.रायगड) येथे २०० खाटांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याकरीता शासनाने निधी मंजूर केला असताना, सद्य:स्थितीत महाड शहर व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक आणि मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठी असलेल्या महाड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी-२, सहाय्यक अधीक्षक-१ ही पदे आणि ट्रामा केअर सेंटर मध्ये वैद्यकीय अधिकारी-२, भुलतज्ञ-२, अस्थिव्यंग शल्यचिकित्सक-१ ही पदे रिक्त असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात तज्ञ डॉक्टर नसल्याने कोणत्याही प्रकारच्या शस्त्रक्रिया होत नसून गंभीर रुग्ण व सिझेरियनची आवश्यकता असणाऱ्या गरोदर महिलांना माणगाव, पनवेल अथवा खाजगी रुग्णालयात पाठवावे लागत असल्याने मोठ्या प्रमाणात वेळ व पैसा खर्च होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपघातग्रस्त रुग्णांना रुग्णालयात गोल्डन अवर मध्ये आवश्यक ते वैद्यकीय उपचार मिळत नसल्याने रुग्ण दगावण्याचीही शक्यता असल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने महाड ग्रामीण रुग्णालयाचे नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयात श्रेणीवर्धन होईपर्यंत ट्रामा केअर सेंटर मध्ये रिक्त असणारी सदर पदे भरण्याबाबत नागरिकांकडून सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाकडून महाड ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन उपजिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत मान्यता देण्यात आली असून, सदर रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबतची शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

रूग्णांना तातडीच्या रूग्णसेवा मिळाव्यात व रूग्णसेवेत अडथळे निर्माण होऊ नये याकरीता विशेषज्ञांच्या सेवा प्रतिनियुक्तीने व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ऑन कॉल बेसेस वर घेण्यात येत आहेत. तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीमार्फत रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरण्यात येतात.

महाड ग्रामीण रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची २ पदे रिक्त आहेत. तसेच सहाय्यक अधीक्षक, गट-क चे १ पद रिक्त आहे. वैद्यकीय अधिकारी, गट-अ च्या रिक्त पदावर ग्रामीण रूग्णालय, रोहा व जिल्हा रूग्णालय, अलिबाग येथील प्रत्येकी १ वैद्यकीय अधिकारी यांचे प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे.

ट्रामा केअर सेंटरची ५ पदे मंजूर असून ५ पदे रिक्त आहेत. त्यातून २ पदांवर राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अस्थिव्यंग १ पद व भूलतज्ञ १ पदावर नेमणूक देण्यात आली आहे.
(२) महाड ग्रामीण रूग्णालयात व ट्रामा केअर युनिट येथील वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त राहिल्यास रूग्णालयात रूग्णांना तातडीने रूग्ण सेवा मिळावी व रूग्णसेवेत अडथळे निर्माण होऊ नयेत याकरीता विशेषज्ञांच्या सेवा प्रतिनियुक्तीने व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ऑन कॉल बेसेस वर घेण्यात येत आहेत व रूग्णांना वैद्यकीय सेवा पुरविल्या जात आहेत.

रूग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे कडून उपचारार्थ आलेल्या रूग्णांवर योग्य ते उपचार करून चांगल्या व गुणात्मक रूग्णसेवा पुरविल्या जात आहेत.

रूग्णालयात प्रसुतीसाठी आलेल्या महिलेची प्रसुती रूग्णालयात केली जाते. तसेच प्रसुतीसाठी आलेल्या महिला रूग्णांना सिझेरियनची आवश्यकता असल्यास सिझेरियन केले जात आहे. तसेच अतिगंभीर रूग्णांना आवश्यकता असल्यास पुढील उपचारासाठी शासकीय रूग्णालयात संदर्भित केले जाते.
(३) महाड ग्रामीण रूग्णालय व ट्रामा केअर सेंटर मध्ये रिक्त पदे भरण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून मागणी होत आहे हे खरे आहे.
(४) वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१ चे पद व वैद्यकीय अधिकारी, गट-अ ची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच सहाय्यक अधीक्षक हे पद पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

तसेच १ प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, २ अधिपरिचारिका, १ अधिपरिचारक, २ कक्षसेवक, १ कक्षसेविका, १ दंतसहाय्यक यांना ग्रामीण रूग्णालय व ट्रामा केअर युनिट, महाड येथे सन २०२४ मध्ये पदस्थापना देण्यात आली आहे.

तसेच जी पदे रिक्त राहतात ती प्रतिनियुक्तीने व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ऑन कॉल बेसेस वर घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महापे (नवी मुंबई) येथील ज्वेलरी पार्कच्या जागेवर डेब्रिज माफियांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(१३) * २३९०७ श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील एम.आय.डी.सी. क्षेत्रात ज्वेलरी पार्क उभारण्यासाठी रत्ने आणि आभुषण निर्यात संवर्धन परिषद या स्वायत्त संस्थेबरोबर करार करुन देण्यात आलेल्या ८६ हजार चौ.मी. भुखंडावर बेकायदेशीररित्या डेब्रीज माफियांनी अतिक्रमण केल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात रत्ने आणि आभुषणे बनविणारी १ हजारहून अधिक लहान केंद्र व दुसऱ्या टप्प्यामध्ये ५०० ते ७०० चौरस फुटांचे गाळे तयार करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजगार निर्मितीसाठी तसेच महसूल मिळवून देणारा महत्वाकांक्षी सदर प्रकल्प त्वरीत कार्यान्वित करण्यासाठी ३ वर्षामध्ये कोणतीही कार्यवाही एम.आय.डी.सी.च्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या भूखंडावर पूर्वी मेट्रो-३ च्या कामामध्ये निघणारी माती व बांधकामाचा साहित्य टाकण्यास परवानगी देण्यात आली असून ती उचलण्यासाठी एम.आय.डी.सी.ला रुपये १० कोटी खर्च येणार होता परंतु एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकादेशीर पध्दतीने डेब्रीज माफियांनी टाकलेल्या हजारो टन बांधकाम साहित्य काढण्यासाठी एम.आय.डी.सी.ला रुपये १३५ कोटी खर्च येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या भुखंडावर बेकायदेशीर पध्दतीने डेब्रीज टाकणाऱ्या माफियांवर तसेच यासाठी जबाबदार असलेल्या एम.आय.डी.सी.च्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन राज्याच्या दृष्टीने महत्वाचा असलेला ज्वेलरी पार्क प्रकल्प सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे नाही.

मऔवि महामंडळाकडून मे.जेम्स व ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कॉन्सिल (GJEPC) यांना टि.टि.सी.औद्योगिक क्षेत्रात ८६०५३ चौ.मी.क्षेत्र फळाचा भूखंड क्र.ईएल-२३७ आहे त्या स्थितीत (As is where is basis) वाटप करण्यात येत असल्याचे Comfort Letter दिनांक ०८/०३/२०१९ रोजी देण्यात आले आहे.

मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) या प्रकल्पाच्या कामात उत्खन्नापोटी निघणारी माती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दिनांक ३०/१२/२०१४ रोजीच्या पत्राव्दारे केलेल्या विनंतीनुसार मऔवि महामंडळाने टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील ईएल झोनमधील ओएस-७ या मोकळया भुखंडावर माती टाकण्यासाठी परवानगी दिनांक ०१/०२/२०१६ रोजी दिली होती.

मऔवि महामंडळाने मे.जेम्स व ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कॉन्सिल (GJEPC) यांना भुखंड वाटप केल्यानंतर सुध्दा मेट्रो-३ चे डेब्रिज व इतर डेब्रिज तेथे टाकले जात होते. महामंडळाकडून सदर डेब्रिजचे

सर्वेक्षण केल्यानंतर त्यांना भुखंड वाटप करताना असलेले २,७१,७२१.७८ घ.मी.डेब्रिजचे परिमाण नंतर डेब्रिज टाकणे सुरु राहिल्याने ११,४०,४००.०० घ.मी. इतके झालेले आहे.

(२) सदर पार्क करताना मऔवि महामंडळाने ३ चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) यापूर्वी दिलेला आहे. तद्नंतर अतिरिक्त २ FSI (एकूण ५ FSI) द्यावयाचा झाल्यास त्यापैकी ०१ FSI लॅब ग्रोन डायमंडस उद्योगासाठी वापरण्यात यावा या अटीच्या अधीन राहून अतिरिक्त FSI ची परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) मऔवि महामंडळाच्या धोरणानुसार टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील ओएस-७ या मोकळया जागेचे रुपांतर औद्योगिक भुखंडामध्ये करुन उपलब्ध होणारे ८६०५३ चौ.मी. क्षेत्र (ईएल-२३७) मे.जेम्स व ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कॉन्सिल (GJEPC) यांना वाटप केलेले आहे.

सदर घटकाच्या विनंतीनुसार त्यांचे खर्चाने सदर भुखंडाचे Geographic Survey करणे व सिमांकन करण्याकरीता व सदर भुखंडाचे सभोवताली संरक्षक भिंत बांधण्याकरीता मऔवि महामंडळाने निविदा प्रक्रिया राबवून दिनांक २५/०३/२०२२ व दिनांक १२/०७/२०२२ रोजी अनुक्रमे वरील दोन्ही कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. सदर दोन्ही कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर भुखंडावर मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) या प्रकल्पाच्या कामात उत्खन्नातून निघालेले डेब्रिज टाकण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर भुखंडाचे सपाटीकरण करण्यासाठी निविदा क्र.बी-२/५४ सन २०२३-२०२४ अन्वये वाटप करण्यात आले असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) या प्रकल्पाच्या कामात उत्खन्नापोटी निघणारी माती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे दिनांक ३०/१२/२०१४ रोजीच्या पत्राव्दारे केलेल्या विनंतीनुसार मऔवि महामंडळाने टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील ईएल झोनमधील ओएस-७ या मोकळया भुखंडावर माती टाकण्यासाठी परवानगी दिनांक ०१/ ०२/ २०१६ रोजी दिली होती.

मे.जेम्स व ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल (GJEPC) ही स्वायत्त संस्था असल्यामुळे त्यांना सदर भुखंडावर डेब्रिज टाकण्यास अटकाव करणे शक्य नव्हते. महामंडळाने त्यांना भुखंड वाटप केल्यानंतर सुध्दा मेट्रो-३ प्रकल्पाचे डेब्रिज व आजुबाजूचे डेब्रिज तेथे टाकले जात होते. महामंडळाकडून सदर डेब्रिजचे सर्वेक्षण केल्यानंतर त्यांना भुखंड वाटप करताना असलेले २,७१,७२१.७८ घ.मी.डेब्रिजचे परिमाण नंतर डेब्रिज टाकणे सुरु राहिल्याने ११,४०,४००.०० घ.मी. इतके झालेले आहे. त्यामुळे सदर अतिरिक्त डेब्रिजचा भार त्यांना उचलणे शक्य नाही. यास्तव मे.जेम्स व ज्वेलरी एक्सपोर्ट प्रमोशन कॉन्सिल (GJEPC) यांनी अशी विनंती केली की, मऔवि महामंडळास त्यांचेकडून अतिरिक्त ०१ चटई निर्देशांकापोटी ८६०५३.०० चौ.मी. इतके क्षेत्रफळ असलेले व आज रोजीचे बाजारभावानुसार रुपये ३४४.२१ कोटी किंमतीचे विकसित बांधकाम विनामुल्य मिळणार आहे, त्यामुळे Comfort Letter देण्याच्या अगोदर असलेले १०.०० कोटी किंमतीचे डेब्रिज वगळून, उर्वरित डेब्रिज काढण्याचा अंदाजित खर्च रुपये ११७.९६ कोटी (नक्त) व रुपये १३५.६५ कोटी (ठोक) इतका आहे. तो महामंडळाने करुन सदर भुखंडाचे सपाटीकरण करुन देण्यात यावे. त्यानुसार सदर संस्थेने दिनांक ०४/०३/२०२४ रोजी रुपये १०.०० कोटी अधिक १८ टक्के वस्तु व सेवा कर रु-१.८० कोटी असे एकूण रुपये ११.८० कोटी रक्कमेचा भरणा महामंडळास केला आहे. सबब, सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * २३१७९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात सध्या मोठ्या प्रमाणावर विनापरवाना आणि कोणत्याही पदवीविना वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टरांचे प्रमाण वाढले असून कळवा (जि.ठाणे) येथील एका दवाखान्यात २३ वर्षांच्या मुलाचा तसेच २५ वर्षीय गर्भवती महिलेचा उपचार घेताना मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ठाणे जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

(२) बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४१९ व ४२० अंतर्गत संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून मा.न्यायालयामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय मनोरुग्णालयांमध्ये स्वयंपाकाच्या साहित्य खरेदीत भ्रष्टाचार होत असल्याबाबत

**(१५) * २३८७६ श्री.राजेश राठोड, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पुणे येथील मनोरुग्णालयांमध्ये स्वयंपाकांच्या साहित्य खरेदीकरीता निविदा काढल्या जात असून सदर साहित्य खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साहित्य खरेदीच्या वेळी मनोरुग्णालयाचे अधीक्षक व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी निविदा प्रक्रियेमध्ये बाजार भावापेक्षा अधिक रक्कमेच्या निविदांना मंजूरी देऊन शासकीय रकमेचा अपव्यय केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्वयंपाकाच्या साहित्य खरेदीमध्ये शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असल्याबाबत सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यात विशेषत: पुणे जिल्ह्यातील शासकीय मनोरुग्णालयामध्ये स्वयंपाकाच्या साहित्य खरेदीमध्ये जास्त दराने देण्यात आलेली निविदा रद्द करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर कामाची ई-निविदा Gem पोर्टलवर राबविण्यात आली होती. निम्नत्तम दरांची निविदा केंद्रीय खरेदी समितीकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री क्षेत्र निमगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील श्री खंडोबा देवस्थान परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) * २३१४७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. श्री क्षेत्र निमगाव (ता.खेड, जि.पुणे) येथील श्री खंडोबा देवस्थान प्रसिध्द आणि पुरातन असून वर्षभरात होणाऱ्या सोमवती अमावस्या, चंपाषष्टी, माघ पोर्णिमा, चैत्र पोर्णिमा आदी दिवशी यात्रेसाठी लाखो भाविक राज्यभरातून येत असून, सदर ठिकाणी देवाची पालखी नेण्यासाठी साकव पूल नसल्याने देवाच्या पालखीस व भाविकांना रहदारी करताना अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निमगाव (ता.खेड, जि.पुणे) मार्गे काळूस मार्गातील वाटेकरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याची देखील दूरवस्था झाल्याने भाविकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु देवस्थानच्या ठिकाणी भाविकांची होत असलेली गर्दी पाहता या ठिकाणी पालखी रस्त्यात साकव पूल बांधण्याबाबत तसेच उक्त नमूद रस्त्याचे कॉक्रींटीकरण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) व (४)

सदर तीर्थक्षेत्र "क" वर्ग दर्जाचे आहे. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार गट "क" दर्जाच्या तीथक्षेत्राच्या ठिकाणी पायाभूत सुविधा जिल्हा नियोजन समिती मार्फत देण्याची तरतुद आहे, त्यामुळे या ठिकाणी भाविकांची गैरसोय दूर करण्याकरीता २०० मीटर लांबीचे रस्त्याचे काँक्रीटीकरण व साकव पुलाच्या कामासाठी निधी मंजूरीचा प्रस्ताव सादर करणेबाबत पुणे जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीस कळविले आहे.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील केमिकल कंपनीत स्फोट होऊन कामगाराच्या झालेल्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत

**(१७) * २३६२५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती व पुरदंर (जि.पुणे) येथील सीमेवर असणाऱ्या ज्युबिलंट इनग्रेव्हिया या केमिकल कंपनीत झालेल्या स्फोटात एका कामगाराचा दिनांक २ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान मृत्यू झाल्याप्रकरणी वडगांव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कंपनी व्यवस्थापन जबाबदार असून फौजदारी गुन्हा दाखल न करण्याची तसेच अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सदर प्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल न करता अकस्मात मृत्यूची नोंद करणाऱ्यांवर तसेच उक्त कंपनीविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करुन कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशतः खरे आहे.

ज्युबिलंट इनग्रेव्हीया लिमिटेड, निंबुत, ता.बारामती, जि.पुणे या कारखान्यात दिनांक ०२ सप्टेंबर, २०२३ रोजी झालेल्या इथाईल ॲसीटेट प्लांट क्र. ०५ मध्ये रिबॉयलरच्या कामगाराचा साफसफाईचे काम करत असताना अचानक आग (Flash Fire) लागल्याने एकूण तीन कामगारांना भाजले. त्यापैकी एका कामगाराचा दिनांक, ६ सप्टेंबर २०२३ रोजी मृत्यू झाला असून दोन जखमी कामगारांना औषधोपचारानंतर सोडण्यात आले आहे. हे कामगार कामावर रुजू झाले आहेत.

याप्रकरणी वडगाव निंबाळकर, पोलीस स्टेशन अ.म.रजि.नं. ४६/२०२३ सी.आर.पी.सी. १७४ अन्वये दिनांक ०२/१०/२०२३ रोजी रजिस्टरी अकस्मात मयत दाखल करण्यात आले आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशी दरम्यान योग्य सुरक्षीत कार्यप्रणाली अवलंबण्यात आली नसल्याचे निदर्शनास आल्याने त्यास अनुसरुन कारखाने अधिनियम १९४८ मधील ७-अ (२)(क) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियम ७३ क नुसार कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत भोगवटादाराविरुध्द एक खटला आणि व्यवस्थापकाविरुध्द एक खटला असे एकूण दोन खटले मा.अतिरिक्त मुख्य न्यायाधीश, पुणे यांच्याकडे दाखल करण्यात आलेले आहेत.

याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या अनुषंगाने पोलीस स्टेशनने मागविलेला अहवाल सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पुणे यांचेकडून वडगाव निबांळकर पोलीस स्टेशनला देण्यात आला असून पोलीस विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यात आयुष्मान भारत योजनेची व्याप्ती वाढविण्याबाबत

**(१८) * २३७७० डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोरगरीब, गरजू रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी शासनाच्या वतीने सन २०१८ पासून आयुष्मान भारत योजना राबविण्यात येत असून सदर योजनेतून जीवनशैलीशी संबंधित आजार, संसर्गजन्य आजार, सिकलसेल, थैलेसेमिया, क्षयरोग अशा आजारांवर शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यात आयुष्मान आरोग्य योजनेंतर्गत १३,९९,७३७ लाभार्थी असून अद्यापपर्यंत फक्त अंदाजे ४ लाख व्यक्तींना आयुष्मान भारत योजनेचे कार्ड मिळाले असून, हिंगोली जिल्ह्यातदेखिल सदर योजना राबविणाऱ्या यंत्रणेच्या उदासीनतेमुळे योजनेचे कार्ड वाटपाचे ५० टक्केही काम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर व हिंगोली जिल्ह्यातील आयुष्मान भारत योजनेचे कार्ड वाटपाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही भारत सरकारची प्रमुख आरोग्य योजना आहे. ही योजना महाराष्ट्र राज्यात २३ सप्टेंबर २०१८ पासून विद्यमान महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने सोबत एकत्रितपणे लागू केली जात आहे. योजनेंतर्गत लाभार्थ्यांना १२०९ आजारांवर योजनेच्या एकूण ९९७ (१९६ शासकीय व ८०१ खाजगी) अंगीकृत रुग्णालयांमधून मोफत उपचार देण्यात येत असून त्यामध्ये संसर्गजन्य आजार, सिकलसेल, थैलेसेमिया, क्षयरोग या आजारांचा समावेश आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

नागपुर जिल्ह्यामध्ये एकत्रित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फ़ुले जन आरोग्य योजनेंतर्गत एकूण ४७,५६,०३८ लाभार्थ्यांपैकी दिनांक ३० एप्रिल २०२४ अखेर पर्यंत १४,२६,६१३ इतक्या लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करण्यात आले तर कार्ड निर्माणाची ही संख्या दिनांक २८ मे २०२४ अखेर पर्यंत १४,३८,७३४ इतकी वृद्धिंगत झाली.

तर हिंगोली जिल्ह्यामध्ये एकत्रित योजनेंतर्गत ११,२२,३६३ लाभार्थ्यांपैकी दिनांक ३० एप्रिल २०२४ पर्यंत ३,७५,६९० इतक्या लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करण्यात आले तर कार्ड निर्माणाची ही संख्या दिनांक २८ मे २०२४ अखेर पर्यंत ३,७६,७९० इतकी वृद्धिंगत झाली.
(३) आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या सुरवातीच्या टप्प्यात आयुष्मान कार्डांची निर्मीती BIS १. ओ या प्रणालीद्वारे केली जात होती. सदर प्रणाली अंतर्गत केवळ आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचाऱ्यांमार्फ़त लाभार्थ्यांचे कार्ड निर्माण करता येत होते. BIS १. ओ या प्रणालीअंतर्गत माहे ऑगष्ट २०२३ पर्यंत ९८ लक्ष लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माण करण्यात आले.

आयुष्मान कार्डांचे निर्माण व वितरणाची गती वाढविण्याकरीता तसेच BIS १.ओ प्रणालीमधील तांत्रीक अडचणी दुर करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाकडून BIS २. ओ ही सुधारीत संगणक प्रणाली २८ ऑगस्ट २०२३ पासून राज्यात लागू करण्यात आली आहे. या प्रणाली अंतर्गत आयुष्मान कार्ड निर्माण करण्याकरीता Operator व Beneficiary हे दोन विकल्प उपलब्ध असून सद्य:स्थितीमध्ये Operator लॉगीन द्वारे आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचाऱ्यांबरोबरच राज्यातील आशा कर्मचारी, स्वस्त धान्य दुकान चालक आयुष्मान कार्डांचे निर्माणाचे काम करत आहेत. त्याकरीता राज्यातील

६४९९६ आशा कर्मचाऱ्यांचे तर ३१००० स्वस्त धान्य दुकान चालकांचे Operator लॉगीन बनविण्यात येऊन त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. याबरोबरच राज्यातील अंगणवाडी सेवीका व अंगणवाडी मदतनीस यांचे देखील Operator लॉगीन बनविण्याकरीता सदर कर्मचाऱ्यांची अद्ययावत माहिती प्राप्त होणेकरीता संबंधित विभागाकडे पाठपुरावा चालु आहे जेणेकरुन आयुष्मान कार्ड निर्माण व वितरणाच्या कामाला गती येईल. तर आयुष्मान ॲप मधील Beneficiary विकल्पाद्वारे लाभार्थी स्वत: आधार संलग्नित ई-केवायसी करून आयुष्मान कार्ड निर्माण व डाऊनलोड करु शकतात. राज्यातील आशा कर्मचाऱ्यांमार्फ़त लाभार्थ्यांना आयुष्मान कार्ड वितरीत केले जात आहेत.

सद्य:स्थितीमध्ये २.७६ कोटी लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड निर्माण करण्यात आलेले आहेत तर उर्वरीत लाभार्थ्यांच्या आयुष्मान कार्ड निर्माणाच्या कामाला गती देऊन आयुष्मान कार्ड निर्माणाचे १०० टक्के उद्दिष्ट लवकरात लवकर पूर्ण करण्याकरीता शासन स्तरावरून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच राज्य आरोग्य हमी सोसायटी कडूनही जिल्हा प्रशासनाशी पत्रव्यवहार करुन, बैठका घेऊन आयुष्मान कार्ड निर्माणाचे काम वाढविण्याकरीता प्रयत्न केले जात आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथील कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकाऱ्यांअभावी रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१९) * २३९२९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोप्रोली (ता.उरण, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्रीच्या वेळी वैद्यकीय अधिकारी उपस्थित नसल्याने उरण परिसरातील दुर्गम भागात राहणारे आदिवासी, शेतकरी यांना वेळेत उपचार मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असून, चिरनेर, खैरकाठी येथे राहणाऱ्या १२ वर्षीय मुलीला दिनांक ०९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास रात्रीच्या वेळेत विंचू दंश झाल्यानंतर उक्त प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध नसल्याने उरण येथील इंदिरा गांधी रुग्णालयात दाखल करावे लागल्याचे दिनांक २७ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित दोषी वैद्यकीय अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली व उरण परिसरातील रुग्णांची गैरसोय टाळण्याकरीता क्रोपोली प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३)नसल्यास विलंबाची कारणे कोणती?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) प्राथमिक आरोग्य केंद्र कोप्रोली, ता.उरण येथे नियमित रूग्णसेवा पुरविली जात असून एप्रिल, २०२३ ते मार्च, २०२४ या कालावधीत ०९ सर्पदंश, १९ विंचूदंश, ११०२ श्वानदंश झालेल्या रूग्णांना उपचार करण्यात आले आहेत. सबब विंचूदंश, सर्पदंश झालेल्या रूग्णांना वेळेत उपचार मिळत नसल्याची बाब खरी नाही.

दिनांक ०९/०३/२०२४ रोजी रात्री १० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र, कोप्रोली येथे रानसई खैरवाडी, ता.उरण येथील विंचूदंश झालेली (वय १८ वर्ष) रूग्ण कुमारी निशा संतोष भगत आली होती. वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनिधी प्रसाद ह्या आपली ड्युटी करून संध्याकाळी ०७:३० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्रापासून २० किमी अंतरावरील त्यांच्या राहत्या घरी गेल्या होत्या. पण त्या दिवशी रात्रपाळी करीता ऑन ड्युटी स्टाफनर्स व शिपाई कार्यरत होते. ज्यावेळी रूग्ण आरोग्य केंद्रात दाखल झाला त्यावेळी त्या स्टाफनर्सने वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनिधी प्रसाद यांना फोन करून त्यांच्या सूचनेप्रमाणे सदर रूग्णास प्राथमिक उपचार दिले व पुढील उपचारासाठी तात्काळ आरोग्य केंद्राच्या रूग्णवाहिकेने ग्रामीण रूग्णालय, उरण येथे संदर्भित केले.

(२) सदर प्रकरणी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नोटीस देण्यात आली आहे. तसेच सर्व वैद्यकीय अधिकारी यांना मुख्यालयी राहण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून लेखी सूचना देण्यात आल्या आहेत.

सद्य:स्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र, कोप्रोली येथे ४ पैकी ४ वैद्यकीय अधिकारी पदे भरलेली आहेत (१ नियमित/१ बंधपत्रित/२ कंत्राटी). तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरीपाडा, मालाड (प.), मुंबई येथील निर्माणाधीन इमारतीतील सेप्टीक टँकमध्ये उतरलेल्या कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२०) * २४०२० श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड (प.) येथील पिंपरीपाडा, परिसरातील रहेजा टॉवर या निर्माणाधीन इमारतीच्या सेप्टीक टँकच्या ४० फूट खोल टाकीत उतरलेल्या ४ कामगांरापैकी २ कामगारांचा मृत्यू झाला असून एका कामगाराची प्रकृती चिंताजनक असल्याची बाब दिनांक २४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रहेजा टॉवर ही खाजगी इमारत असून, बांधकामादरम्यान सेप्टीक टॅंक स्वच्छ करण्यासाठी खाजगी ठेकेदाराने कामगार आणले होते व कायद्यान्वये कामगारांना सेप्टीक टॅंक मध्ये उतरण्यास मनाई असताना सदर कंत्राटदाराने कामगारांना कोणतीही सुरक्षिततेची साधने न देता टाकीत उतरविल्यामुळे सदर दुर्घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील संबंधित दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई केली व सदर घटनेतील मृतांच्या कुटुबिंयाना आर्थिक मदत तसेच जखमींवर उपचार करण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) खरे आहे,

रहेजा रेसिडेन्सी, पिंपरी पाडा, मालाड (पुर्व), मुंबईच्या कंपाऊंड मध्ये दिनांक २४ एप्रिल, २०२४ रोजी सेप्टींक टॅंक साफ करण्यासाठी उतरलेल्या कामगाराचा मृत्यू झालेला असून व त्याला वाचवण्यासाठी सेप्टीक टॅंकमध्ये उतरलेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला तर अन्य एक व्यक्ती जखमी झालेली आहे. सदर अपघाताच्या संबंधित जबाबदार व्यक्तींवर सुरक्षिततेची कोणतीही साधने पुरविली नसल्याची बाब समोर आली आहे.

(३) पिंपरीपाडा, मालाड (पूर्व), येथील विकासकामार्फत मृत कामगाराच्या, बाहेरील मृत व्यक्तीच्या वारसदारांस व जखमी व्यक्तीच्या वारसदारांस प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे तात्काळ आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच मयत कामगाराच्या वारसदारास नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत मा.कामगार न्यायालय तथा कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांचेमार्फत कार्यवाही सुरू आहे.

सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने सुरक्षीततेची कोणतेही साधने न पुरवता सेप्टीक टँकमध्ये उतरवल्यामुळे, हयगय व निष्काळजीपणाचे कृत्य केल्याने भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३०४-ए, ३३६, ३३८ अन्वये संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच कामगारांच्या मृत्यूसंदर्भात किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ या कामगार कायद्यांतर्गत संबंधिताविरुध्द खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(२१) * २४०७२ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रावर कार्यरत असलेल्या कंत्राटी बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकाऱ्यांना गत नऊ महिन्यापासून वेतन मिळत नसल्याने या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्काळ वेतन अदा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे जानेवारी, २०२४ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आले असून फेब्रुवारी, २०२४ ते मे, २०२४ पर्यंतचे मानधनाचे देयक जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करण्यात आले आहे. त्यापैकी डॉ.प्रिया प्रल्हाद साकोरे यांचे अदाता नोंदणी जिल्हा कोषागार कार्यालय, भंडारा कडे प्रलंबित असल्यामुळे त्यांचे माहे फेब्रुवारी, २०२४ पासून मानधन प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२२) * २४१९४ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याबाबत तत्कालीन शासनाने सन २०२१-२०२२ मध्ये विधिमंडळात विधेयक मंजूर केले असून सदर आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठासाठी युजीसीकडून मास्टर्स डिग्री, कोर्सेस मंजूर करुन त्यासाठी तज्ञ समितीची नियुक्ती व त्याचबरोबर कुलगुरु नियुक्तीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात येऊनही अद्याप सदर प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे मे, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याबाबत प्रलंबित असलेल्या निर्णयाबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ, महाराष्ट्र या विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरुची नियुक्ती दिनांक ११/५/२०२३ च्या अधिसूचनेन्वये केली आहे.तसेच कुलगुरुच्या निवडीसाठी शोध–नि-निवडसमिती गठीत करणे व नियमित कुलगुरुची नियुक्ती यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीमधील इंडिया बुल्स एसईझेड प्रकल्पाच्या विनावापर जागेबाबत

**(२३) * २३०३० श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १९७३९ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुसळगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये इंडिया बुल्स इंडस्ट्रीज इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत बहुउद्देशीय विशेष आर्थिक क्षेत्र उभारणी करीता १०४७.८२ हेक्टर आर क्षेत्राचे वाटप करण्यात आलेली जमीन इंडिया बुल्स एसईझेड प्रकल्प बंद पडल्यामुळे विनावापर पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष आर्थिक क्षेत्राकरीता अधिसूचित झालेले क्षेत्र विना अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ व दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास देण्यात येऊनही सदरील प्रस्ताव महामंडळाने अद्यापही शासनाला सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीन शासनाकडे परत घेण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने इंडिया बुल्स कंपनीला माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान नोटीस पाठविली असून न्यायालयात याबाबत सावधान पत्र (कॅव्हेट) दाखल करून सदर क्षेत्र ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त जमीन इतर उद्योगांना वाटप करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व इतर संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** १) अंशत: खरे आहे.

अति. सिन्नर औद्योगिक क्षेत्र (SEZ) या औद्योगिक वसाहतीमध्ये केंद्र शासन सेझ अधिनियम २००५ दिनांक २७/१०/२००९ अन्वये मे. इंडियाबुल्स एसईझेड या प्रकल्पासाठी १०४७.८२ हे. आर. इतके वाटप करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्रोसेसिंग झोन - ५१२.०६ हे.आर., नॉन प्रोसेसिंग झोन- ४९९.१९ हे. आर. तसेच मे.युरोटस इं.लि-३६.३७ हे.आर. एवढे क्षेत्र आहे.

मे. इंडियाबुल्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीने विहित मुदतीत भूखंडाचा विकास केलेला नसल्यामुळे, सदर क्षेत्र (५१२.०६ हे. आर) परत घेण्याबाबत शासन स्तरावर दिनांक ०६/०८/२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने नोटीस देऊन क्षेत्र परत घेण्याच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक १५/०२/२०२२ रोजीच्या टिपणीच्या निर्देशान्वये मे. इंडियाबुल्स कंपनीला प्रोसेसिंग क्षेत्र परत घेण्यासाठी विधितज्ञ व विधी विभागाच्या मार्गदर्शनानुसार नोटीस निर्गमित करण्यात आलेली असून सक्षम अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नाशिक यांनी The Bombay Govt. Premises (Eviction) Act १९९५ अंतर्गत प्रोसेसिंग झोन ५१२.६८ हे. आर. क्षेत्राबाबत इव्हीक्शन नोटीस दिनांक २९/०२/२०२४ रोजी निर्गमित करुन सदरचे क्षेत्र महामंडळाकडे ताब्यात घेण्यात घेण्याबाबत आदेश केलेला आहे. त्याअनुषंगाने नाशिक व सिन्नर येथील न्यायालयात अनुक्रमे दिनांक ०६/०३/२०२४ व दिनांक ०७/०३/२०२४ रोजी कॅव्हेट दाखल केलेले आहे. तसेच मुख्यालयीन विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालयातही कॅव्हेट दाखल केलेले आहे.

सदर प्रकरणी मे. इंडियाबुल्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र. १०११९/२०२४ दाखल केलेला होता.मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सदरील दावा उच्च न्यायालयाऐवजी कनिष्ठ न्यायालयात दावा दाखल करण्याच्या निर्देशान्वये कंपनीने मा.जिल्हा-न्यायालय नाशिक येथे दावा क्र. ५५/२०२४ दाखल केलेला आहे.

त्यामुळे सदरचे क्षेत्र ताब्यात घेण्याची प्रक्रिया प्रलंबित असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायाप्रविष्ट आहे.

(२) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने कार्यवाही प्रलंबित आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्याय निर्णयानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांच्या श्रेणीवर्धन निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * २४०३८ श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांना श्रेणीवर्धन करण्यासाठी साहित्याचा पुरवठा न करताच जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाने लाखो रुपयांची देयकाची रक्कम कंत्राटदाराला अदा केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालकल्याण विभागामार्फत अंगणवाड्यांना श्रेणीवर्धन करण्यासाठी केंद्र शासनामार्फत प्राप्त झालेल्या निधीची संपूर्ण वस्तुनिष्ठ चौकशी करून सात दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) अंशतः खरे आहे.

जिल्हा परिषद नागपुर अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे १३ प्रकल्प कार्यरत असून १ प्रकल्प (नागपुर ग्रामीण) वगळता सर्व प्रकल्पामध्ये साहित्य पुरवठा झाल्यानंतरच देयके अदा करण्याची कार्यवाही झालेली असल्याचे दिसुन आले.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

अंगणवाडी श्रेणीवर्धनाकरीता प्रति अंगणवाडी रुपये २ लक्ष प्रमाणे ४९ अंगणवाडी केंद्रांकरीता रुपये ९८.०० लाख तसेच अंगणवाडी इमारत देखभाल व दुरस्तीकरीता प्रति अंगणवाडी रुपये ३०००/- प्रमाणे २७१ अंगणवाडी केंद्रांकरीता रुपये ८.१३ लाख अशाप्रकारे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात केंद्र व राज्य हिश्याचा एकूण रुपये १०६.१३ लाख इतका निधी एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयामार्फ़त जिल्हा परिषद, नागपूर यांना वितरित करण्यात आला होता.

सदरचा निधी जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मवावि) यांनी त्यांचे अधिनस्त बालविकास प्रकल्प अधिकारी यांना वितरीत केला होता.त्यानुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडी केंद्राचे श्रेणीवर्धनाकरीता दरपत्रके मागवुन स्मार्ट एल. ई. डी. टीव्ही, वॉटर प्युरीफायर, लोखंडी कपाट, धान्य कोठी, अग्नीशमनयंत्र, Green Siting Mat, Digital Cards, Hand wash station हे साहित्य अंगणवाडीकरीता खरेदी करण्यात आले. सर्वच प्रकल्पामध्ये सारख्याच प्रकारचे साहित्य घेण्यात आल्याचे दिसून आले. याबाबत काही अंगणवाडी केंद्रांमध्ये साहित्य ३१ मार्च, २०२४ नंतर एप्रिल, २०२४ मध्ये प्राप्त झाल्याबाबत तसेच पुरवठा केलेले साहित्य हे निकृष्ट दर्जाचे व वाजवी किमतीचे नसल्याची बाब जिल्हा परिषदेचे स्थायी समिती सभेमध्ये उपस्थित करण्यात आली होती.

त्याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. नागपुर यांचे अध्यक्षतेखाली ३ सदस्यीय चौकशी समिती स्थापन करुन चौकशी अहवाल सादर करणेबाबत निर्देश दिले होते. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित प्रकल्पांच्या जबाबदार प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच, या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२५) * २३२६१ श्री.जयंत पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात पुरेसा पाऊस पडूनही पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन होत नसल्याने नागरिकांना पाणी टंचाई समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे तसेच अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत या चार तालुक्यांमधील २३ हजार ७९८ ग्रामस्थांना पाण्यासाठी केवळ १५ टँकर उपलब्ध होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल तालुक्यातील 'जल जीवन मिशन योजनेचे' काम अपूर्ण असल्याने पाणी टंचाईमुळे टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी पनवेल ग्रामपंचायतीने केली असून तालुक्यातील नागरीकरण वाढत असल्याने वाढत्या लोकसंख्येच्या मागणीप्रमाणे पाणीपुरवठा होत नसून पाणी चोरी व गळतीचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पाणी टंचाई दूर करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीस अलिबाग, पेण, पनवेल व कर्जत या चार तालुक्यातील ११ गावे व ४६ वाड्यांना गट विकास अधिकारी व ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार १५ खाजगी टँकर्सच्या सहाय्याने पाणीपुरवठा करण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) रायगड जिल्ह्यामधील पाणी टंचाई दूर करण्यासाठी ऑक्टोबर, २०२३ ते जून, २०२४ या कालावधीसाठी रुपये २५१.३६ लक्ष किंमतीचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच ज्या गावे वाड्यांना टंचाई कालावधीत खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो अशा गावे व वाड्यांकरीता जल जीवन मिशन कार्यक्रमाअंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांची कामे प्रामुख्याने हाती घेण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासनाच्या रक्त संकलन केंद्रातील कंत्राटी कामगारांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२६) * २२९०२ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या माध्यमातून राज्यभरातील शासकीय रक्त केंद्रांमध्ये दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल) ही रुग्ण हिताची अभिनव योजना सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक शासकीय रक्त केंद्रामध्ये अत्यल्प वेतनावर रक्त संक्रमण अधिकारी, वैद्यकीय समाजसेवक, तंत्रज्ञ यांची नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्ण हिताची जीवन अमृत सेवा (ब्लड ऑन कॉल) ही अभिनव योजना अल्प प्रतिसाद व खर्च जास्त या कारणास्तव दिनांक ३१ मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बंद करण्यात आल्याने या योजनेमध्ये अत्यल्प वेतनावर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त केल्याने त्यांच्यावर बेरोजगाराची वेळ आली असून शासकीय रक्त संक्रमण केंद्रामध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

विविध पदांसाठी सुरूवातीचे एकत्रित वेतन हे रुपये १०,०००/- ते रुपये ४०,०००/- असे होते.

(३) अंशत: खरे आहे.

योजनेस अल्प प्रतिसाद व योजना खर्चीक असल्यामुळे दिनांक ३१/०३/२०२२ पासून बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. परिणामी या योजनेसाठी निर्माण केलेली कंत्राटी पदे व या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात आल्या.

शासकीय रक्तकेंद्रामध्ये रक्ताचा तुटवडा भासत असल्याची धारणा बरोबर नाही.

(४) सेवा समाप्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी पदे निर्माण करुन इतर सेवेत सामावून घेण्याचा विचार करण्यात आला होता.मात्र सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समावेशन करणे शक्य झाले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्रातील नोंदणीकृत फार्मासिस्टना विमा संरक्षण देण्याबाबत

**(२७)** * **२२९२२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुग्णसेवेतील महत्त्वाचा घटक असलेल्या फार्मासिस्टना शासनाकडून कोणत्याच सुविधा मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फार्मासिस्टच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाची होणारी अवहेलना रोखण्यासाठी फार्मासिस्टना कर्नाटक राज्याच्या धर्तीवर विमा संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र नोंदणीकृत फार्मासिस्ट असोसिएशनने महाराष्ट्र राज्य फार्मासिस्ट परिषदेकडे दिनांक ५ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने कर्नाटक राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातील फार्मासिस्टना विमा संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) भारत सरकारच्या औषध व्यवसाय अधिनियम, १९४८ नुसार राज्यात महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद स्वायत्तपणे कार्यरत आहे. सदर परिषद अर्हताधारक औषध व्यावसायिकांचे नोंदणीकरण करते. फार्मासिस्टांना विमा संरक्षण देण्यासंदर्भातचा प्रस्ताव परिषदेच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) * २३०५८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत गटशिक्षण अधिकाऱ्यासह ६ केंद्र प्रमुख, ७ मुख्याध्यापक आणि १६ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे, एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद प्रशासनाच्या २५,००० शाळा मुख्याध्यापकांविना सुरु असून शिक्षण विभागाने तयार केलेल्या संचमान्यतेच्या सुधारित निकषानुसार १३५ पेक्षा कमी पट संख्या असल्यास मुख्याध्यापकाचे पद रद्द होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हा परिषद प्रशासनाच्या ४४९० शाळांपैकी फक्त १,७१२ शाळांमध्ये सी.सी.टीव्ही असून उर्वरित २,७७८ शाळांमध्ये सी.सी.टीव्ही बसविण्यात आलेले नाहीत तसेच जिल्हा परिषद प्रशासनाच्या २,००० शाळांना संरक्षण भिंतीही नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय.?

**श्री.गिरीश महाजन :** (१) खुलताबाद (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत गटशिक्षणाधिकारी संवर्गाचे १ पद, केंद्रप्रमुख संवर्गाची ६ पदे, मुख्याध्यापकांची ७ पदे आणि प्राथमिक शिक्षकांची ९ पदे रिक्त आहेत.
(२) राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापकांची ३००७ पदे रिक्त आहेत. शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित इ.) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्यानुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहीत केले आहेत. या शासन निर्णयानुसार मुख्याध्यापक पदाकरीता पटसंख्येचा निकष १५० असून, पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या १३५ आहे.
(३) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या १७१२ शाळांमध्ये सीसीटीव्ही असून उर्वरित २७७८ शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीना सूचना दिलेल्या आहेत. संरक्षण भिंतीबाबत ९८२ प्रस्ताव प्राप्त झाले असून, १७१ प्रस्तावांना एमआरजीएस अंतर्गत मंजूरी मिळालेली आहे.

(४) गटशिक्षणाधिकारी संवर्गाचे रिक्त पद सरळसेवेने/पदोन्नतीने/बदलीने भरण्याची कार्यवाही शालेय शिक्षण विभागाकडून सुरु आहे. तसेच केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे. रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य कार्यरत केंद्रप्रमुख/मुख्याध्यापक/शिक्षक यांचेकडे सोपविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोलगी (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) येथे आमचूर व मसाला क्लस्टर उभारण्याबाबत

**(२९)** * **२३७९२ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोलगी, (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) व परिसरात आमचूरचे उत्पादन मोठ्या प्रमाण होत असून आमचूरचा वापर हा मसाला व इतर बाबींकरीता होत असल्याने मध्यप्रदेश व गुजरात या परराज्यातून मसाला उद्योजक खरेदीसाठी येत असून आदिवासी शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन अत्यल्प दराने खरेदी करून त्यांची फसवणूक करीत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आमचूर व इतर मसाल्यांवर शेती करणाऱ्या आदिवासी समाजाला सामाजिक व आर्थिकदृष्ट्या बळकट करण्याकरीता शासनाकडून कोणती उपाययोजना केली तसेच आमचूर व इतर मसाल्यावर दीर्घ संशोधन होऊन त्याची लागवड वाढविणे, त्यावर प्रक्रिया करणे, उद्योग उभारणे तसेच त्यास जागतिक बाजारपेठ उपलब्ध होणेकरीता अक्कलकुवा (जि.नंदुरबार) येथे आमचूर क्लस्टर उभारणी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नंदुरबार जिल्ह्यामध्ये गतवर्षी एकूण २४ जनजागृती रोजगार मेळावे घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी ४ रोजगार मेळावे अक्कलकुवा तालुक्यात घेण्यात आलेले आहेत. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत मसाला उद्योगशी निगडीत १८ लाभार्थींचे कर्ज प्रस्ताव बँकांना पाठविण्यात आले असून त्यापैकी ४ लाभार्थींना रुपये ६४.८६ लाखाचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन रुपये २०.७२ लाख अनुदान मंजूर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेणसरी वरठपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(३०)** * **२३३५५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेणसरी वरठपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक झाली असून शाळेच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने सदर शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे विद्यार्थी या शाळेच्या इमारतीलगत असलेल्या घरांच्या ओट्यावर बसून शिक्षण घेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत नियुक्त करण्यात आलेले शिक्षक शाळेत येत नसून त्यांनी नियुक्त केलेले रोजंदारी शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शाळेच्या इमारत दुरुस्तीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच उक्त प्रकरणी विलंबास जबाबदार दोषींवर व शाळेत अनुपस्थित राहणाऱ्या शिक्षकांवर कोणती कारवाई शासनाकडून केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
सदर शाळा इमारत धोकादायक झाल्याची बाब निदर्शनास आल्यावर त्याचा पुनर्विकास करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषद शाळा शेणसरी वरठापाडा या शाळेस दोन नवीन वर्गखोलींचे इमारत बांधकाम करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक २९/०१/२०२४ रोजीच्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
या संदर्भातील निविदा प्रक्रीया अंतिम टप्प्यात असून लवकरच बांधकामाकरीता कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषद शाळा शेणसरी वरठापाडा येथे शिक्षकांची दोन पदे मंजूर असून सद्य:स्थितीत १ शिक्षिका कार्यरत आहे. येथील अन्य १ शिक्षक अनाधिकृतरित्या गैरहजर असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक स्वयंसेवकांची नियुक्ती केली होती.
(३) सदर शाळेतील अनधिकृतरित्या गैरहजर राहणाऱ्या शिक्षकावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दिनांक ३१/०५/२०२४ च्या पत्रान्वये दोषारोप बजावले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे ट्रान्स क्रीक इंडस्ट्रीयल एरिया (नवी मुंबई) येथील "ए ब्लॉक" मधील भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(३१) * २३५५९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे ट्रान्स क्रीक इंडस्ट्रीयल एरिया, ए ब्लॉक (नवी मुंबई) मधील श्रमिक नगर येथील शासकीय भूखंडावर अनधिकृत झोपडपट्टी असून सदरील झोपडपट्टीतील १६८ झोपड्यांचे नवी मुंबई महानगरपालिकेने रीतसर सर्वेक्षण करून त्यांना सन २००५ मध्ये वा त्यादरम्यान वाल्मिकी निवास योजनेंतर्गत नव्याने बांधलेल्या इमारतीमध्ये पुनर्वसन केले असूनही दोन्ही विशेष नियोजन प्राधिकरणाकडून सदरील झोपड्या हटविण्यात आले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि नवी मुंबई महानगरपालिकेने सदरहू झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनानंतर शासकीय जागेवर असलेले अतिक्रमण दोन्ही प्राधिकरणामार्फत हटविले नसल्याने सदरहू झोपडपट्ट्यांचा पुनर्वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महानगरपालिकेने संयुक्त कारवाई करून सदर भूखंड ताब्यात घेण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिकेस सदर पुनर्वसन योजना राबविण्याकरीता दिलेल्या परवानगीनुसार नवी मुंबई महानगरपालिकेने सदर झोपड्या पाडुन रिक्त भुखंड CETP सोसायटीस हस्तांतरीत करावयाचा होता.यानुषंगाने दिनांक १३/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सदर अतिक्रमण संयुक्तपणे काढण्याचे ठरले आहे.
(३) मा.उच्च न्यायालयाच्या PIL १७९/२०२३ च्या दिनांक ०३/०४/२०२४ रोजीच्या निर्देशानुसार मऔवि महामंडळ व नवी मुंबई महानगरपालिका यांच्यामध्ये दिनांक १३/०६/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत अतिक्रमण काढण्याचे ठरले व त्यानुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका मा.उच्च न्यायालयात Affidavit सादर करणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये यंत्रसामुग्री खरेदीत व शिल्प निदेशक पद भरतीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३२) * २३८८९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे ५५० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) कार्यरत असून सदरहू संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात कोट्यवधी रुपयांची यंत्रसामुग्री अधिक दराने खरेदी केली असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आय.टी.आय.) शिल्प निदेशक पदाच्या भरतीसाठी काढण्यात आलेल्या जाहिरातीस महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी स्थगिती दिली असतानाही ‘महिला जागा पडताळणीच्या अधीन’ असा शेरा देऊन इतर जागांबाबत अंतिम निवड यादी प्रसिध्द न करता उमेदवारांना थेट नियुक्तीपत्रे देण्यात आली आहेत तसेच सदरहू भरतीबाबत गोपनीय माहिती सोशल मिडियावर प्रदर्शित करुन उमेदवारांकडून शिल्प निदेशक या पदासाठी पैशाची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पदभरती करताना उमेदवारांचे सामान्यीकरण करण्यात आल्याने एकाच शिफ्ट मधील काही मुलांचे २ ते ३ गुण व काही मुलांचे १८ ते २० गुण वाढविण्यात आले असल्याने नियुक्ती न मिळालेल्या उमेदवारांनी याबाबत विचारणा केली असता संचालकांनी असमाधानकारक उत्तरे दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त यंत्रसामुग्री खरेदी व शिल्प निदेशक पदभरतीमध्ये झालेल्या अनियमिततेस दोषी असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

शिल्पनिदेशक या संवर्गातील एकूण १४५७ पदांची जाहिरात क्र.०१/२०२२ संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन घेण्यात आलेल्या सामाईक परिक्षेअंती दिनांक २६/११/२०२३ ते १५/१२/२०२३ या कालावधीत सर्व व्यवसायनिहाय निवड्याद्या प्रसिध्द करण्यात आल्या. त्याअनुषंगाने महिला आरक्षणासंदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल याचिकेच्या अनुषंगाने दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिलेली होती.

सदर स्थगिती ही केवळ महिलांकरीता राखीव पदांसाठी असल्याने,सदर राखीव पदे वगळून उर्वरित पदांसाठी पात्र उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी दिलेली स्थगिती दिनांक ३०/०१/२०२४ रोजीच्या अंतरिम आदेशान्वये उठविल्यानंतर महिलांसाठी राखीव ४३६ पदांबाबत नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. दिनांक १५/०२/२०२४ रोजीच्या अंतिम आदेशान्वये सदर याचिका निकाली काढण्यात आली.

सोशल मिडियावर पदभरतीच्या अनुषंगाने माहिती प्रदर्शित करण्यात आली नसून सदरहू भरतीबाबतची सर्व माहिती/ प्रक्रिया संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सबब, उमेदवारांकडून शिल्प निदेशक या पदासाठी पैशाची मागणी केल्याची बाब निर्दशनास आलेली नाही.

(३) हे खरे नाही.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर गुणांचे सामान्यीकरणामुळे (Normalization) प्रत्येक सत्रातील प्रश्नांच्या काठीण्यपातळीनुसार उमेदवारांच्या गुणांमध्ये वाढ अथवा घट होते.

या संदर्भात सातुले चेतन विरभद्रा व इतर उमेदवारांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल याचिकेमधील दिनांक १०/०५/२०२४ रोजीच्या अंतिम न्यायनिर्णयानुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने देखील एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये झालेल्या परीक्षांमध्ये गुणांचे सामान्यीकरण (Normalization) करणे योग्य ठरविल्याचे नमूद करुन सदर याचिका निकाली काढली आहे.

(४)The Times of India या इंग्रजी वृत्तपत्रामध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत वित्तीय वर्ष २०२२-२३ मध्ये करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीच्या अनुषंगाने प्रसिध्द झालेल्या बातमीस अनुसरुन आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांची एक सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आलेली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवालावातील निष्कर्षानुसार शासन स्तरावर संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी केली आहे. शिल्प निदेशक पदभरतीमध्ये अनियमितता दिसून येत नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील गर्भवती आदिवासी महिलेचा उपचाराअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(३३) * २३१८० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील दुर्गम भागातील आरोग्य सेवेची परिस्थिती अतिशय गंभीर असून शिरसगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या गणेशवाडी (ता.मोखाडा जि.पालघर) येथील गर्भवती आदिवासी महिलेला डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तसेच वेळेत उपचार न मिळाल्याने दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात आजही गर्भवती महिलेस प्रसूतीसाठी डोलीतून नेण्यात येत असून वर्षभरात चांगली आरोग्य सेवा न मिळाल्यामुळे २० माता व २९४ बालके मृत्यूमुखी पडली असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

पहिल्या खेपेची गर्भवती महिलेचे बाळ गर्भपिशवीत मृत झालेले असल्याने तसेच रक्त चाचणीच्या निष्कर्षावरून या महिलेस कावीळ व त्यांची किडनी निकामी झालेली होती. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळा येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचाराकरीता जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे दिनांक १५/०१/२०२४ रोजी संदर्भित करण्यात आले. सिझेरियन प्रसूती करून पुढील उपचारार्थ आय.सी.यू. मध्ये देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. तथापि, उपचार सुरू असताना दिनांक १९/०१/२०२४ रोजी सदर मातेचा दुर्दैवी मृत्यू झाला.

(२) पालघर जिल्ह्यात गर्भवती महिलेस प्रसूतीकरीता नेण्यासाठी शासकीय १०२ व १०८ रुग्णवाहिकेचा वापर केला जातो. गरोदर मातेस उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय येथे नियमित आरोग्य सेवा दिल्या जातात. विविध कारणांमुळे सन २०२३ - २०२४ या वर्षामध्ये १४ माता मृत्यू व ५४ बाल मृत्यू झाले आहेत.

(३) होय.

जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांच्या स्तरावरून चौकशी करण्यात आली. सदर चौकशीमध्ये कोणी दोषी आढळून आलेले नाही. महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग, मुंबई यांच्याकडे दाखल स्वाधिकारे अर्ज सुनावणीअंती निकाली काढला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेडगाव (ता.जि.हिंगोली) ग्रामपंचायत अंतर्गत जल जीवन मिशन योजनेंतील कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(३४) * २३७७३ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेडगाव (ता.जि.हिंगोली) ग्रामपंचायत अंतर्गत पेडगाव व पेडगाववाडी येथील जल जीवन मिशनच्या विहीर, पाण्याची टाकी व पाईपलाईनचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निकृष्ट दर्जाच्या कामामुळे गावामध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी इतरत्र भटकंती करावी लागत असल्यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्रवेशव्दारासमोर ठिय्या आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निकृष्ट कामाची चौकशी करुन सदर पाईपलाईनची दुरुस्ती करुन नळयोजना सुरु होणेबाबत तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मौजे पेडगाव व पेडगाववाडी, ता.जि.हिंगोली येथील जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांची कामे अंदाजित तरतुदीनुसार व योग्य दर्जासह पूर्ण करून नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. कामाच्या दर्जाच्या अनुषंगाने कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची तपासणी सार्वजनिक विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण मंडळाच्या प्रयोग शाळेकडून करण्यात आली असून त्याचे अहवाल योग्य आहेत. त्याच प्रमाणे सदर कामाची शासन नियुक्त त्रयस्थ तांत्रिक तपासणी संस्था टाटा तांत्रिक कंसल्टींग इंजिनिअर्स लिमीटेड या संस्थेमार्फत त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आली असून त्यांचे अहवाल सूध्दा योग्य आहेत. त्यामूळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील पर्यटनास चालना मिळण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३५) * २४०८६ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पवनी (जि.भंडारा) तालुक्याला ऐतिहासिक स्थळाचे वरदान लाभले असून विदर्भाची काशी असलेल्या पवनी शहरात पर्यटनास चालना मिळण्याकरीता येथील मंदिरांचा विकास होण्यासाठी आवश्यक सुविधांचा अभाव असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पवनी शहरातील मंदिरांची दुरुस्ती देखभाल करून पर्यटकांसाठी सर्व सुविधा देण्यासाठी शासनाने कोणता कृती आराखडा तयार केला आहे काय,
(३) असल्यास, सदर आराखड्यास पुरेसा निधी उपलब्ध करून पवनी येथील ऐतिहासिक वारसा टिकविण्यासाठी तसेच पर्यटनास चालना मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात प्रस्ताव प्राप्त न झाल्याने विभागामार्फत आराखडा तयार करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

(३) सदर कृती आराखड्याचा प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यावर प्रशासकीय मान्यता देण्याबाबत पुढील नियोमोचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागातील विविध पदांकरीता पात्र विद्यार्थी नियुक्तीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(३६) * २४२२६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य निरीक्षक आणि बहुद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदांच्या १८०० जागांसाठी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतलेल्या परीक्षांचा निकाल दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास जाहीर करण्यात आला असून सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ४७७ तरुणांना नोकरी देण्याऐवजी शासनाने मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थांमधून उत्तीर्ण झालेल्यांची निवड करुन या ४७७ जणांना प्रतिक्षायादीवर (On Hold) ठेवले असल्याचे दिनांक ७ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच महिन्यांपासून उक्त ४७७ तरुण आरोग्य विभागात नियुक्तीसाठी वारंवार येत असून त्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १८ मे, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ४७७ तरुणांना नोकरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य निरीक्षक आणि बहुद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदांकरीता आवश्यक असलेला सॅनिटरी इन्सपेक्टर अभ्यासक्रम शासन मान्यताप्राप्त शिक्षणसंस्थांमधून उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. तथापि, सदर अभ्यासक्रमाच्या समकक्ष अभ्यासक्रम म्हणून विविध संस्थांचे प्रमाणपत्र / पदविका सादर करणाऱ्या उमेदवारांचे प्रमाणपत्र / पदविकांच्या पडताळणीसाठी दिनांक १८/०४/२०२४ च्या शासन पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीकडून उमेदवारांच्या प्रमाणपत्र/पदविकांची पडताळणीची कार्यवाही सुरु असल्याने होईपर्यंत ३०२ उमेदवारांना प्रतिक्षेत ठेवण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी दुर्गम भागात “फिरता दवाखाना” सुरू करण्याबाबत

**(३७) * २२९६८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक दुर्गम भागातील रुग्ण प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्रांपर्यंतही पोहोचू शकत नसल्यामुळे अशा दुर्गम भागातील पाडे, वस्ती वा तांड्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांमध्ये रुग्णांच्या दारापर्यंत आरोग्य सेवा पोहोचावी या दृष्टिकोनातून आरोग्य विभागाने प्रत्येक जिल्ह्यात “फिरता दवाखाना” (मोबाईल मेडिकल क्लिनिकल व्हॅन) सुरू करण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक, पालघर, अहमदनगर, ठाणे व इतर जिल्ह्यांतील दुर्गम आदिवासी भागात आरोग्य सेवा उपलब्ध नसल्याने रुग्णांना अद्याप डोलीतून उपचारासाठी घेऊन जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यांतील दुर्गम भागात फिरता दवाखाना (मोबाईल मेडिकल क्लिनिकल व्हॅन) उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यातील दुर्गम भागातील काही गावात रुग्णवाहिका जाऊ शकत नसल्याने रुग्णांना रुग्णवाहिकेपर्यंत इतर पर्यायाव्दारे घेऊन जावे लागते.

(३) राज्यात सद्य:स्थितीत आदिवासी दुर्गम भागासाठी १६ जिल्ह्यात ६४ मोबाईल मेडिकल युनिट्स राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यान्वित आहेत.

त्या व्यतिरिक्त राज्य शासनामार्फत सर्वच जिल्हयांमध्ये फिरते रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(४) कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) * २३२५७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) ग्रामपंचायतीमधील कार्यरत असलेले आरोग्य कर्मचारी, पाणीपुरवठा कर्मचारी, दिवाबत्ती कर्मचारी यांचे मागील ९ महिन्यांपासूनचे वेतन थकीत असल्याचे तसेच कर्मचाऱ्यांनी बँकेतून घेतलेल्या कर्जापोटी ग्रामपंचायतीने कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात केलेली बँकेच्या हफ्त्याची रक्कम बँकेत जमा न केल्याने व प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम पोस्टामध्ये न भरल्याने ग्रामपंचायतीत गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेरळ ग्रामपंचायतीने दिनांक १० मार्च, २०२४ रोजीपर्यंत थकीत वेतन व कर्ज हप्ते या संदर्भातील प्रश्न न सोडविल्यास आंदोलन करण्याचा इशारा येथील कर्मचाऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही,

ग्रामपंचायत नेरळ कडून घरपट्टी व पाणीपट्टी वसुली पुरेशी न झाल्यामुळे सदर कालावधीतील वेतनाच्या व कपातीच्या रक्कमा थकीत होत्या. परंतु ग्रामपंचायतीने ९ महिन्याचे थकीत वेतन व कर्मचाऱ्यांनी बँकेतून घेतलेल्या कर्जापोटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणारी रक्कम ग्रामपंचायतीने मोहीम स्वरूपात घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करून ९ महिन्यांच्या थकीत वेतनापैकी ७ महिन्यांच्या वेतनाच्या रक्कमा दिनांक २०/०५/२०२४ रोजी पर्यंत ग्रामपंचायतीने अदा केलेल्या आहेत.
(२) होय,हे खरे आहे,
(३) ग्रामपंचायत नेरळ कडून ९ महिन्यांच्या थकीत वेतन व कर्मचाऱ्यांनी बँकेतून घेतलेल्या कर्जापोटी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात होणारी रक्कम तसेच प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम ग्रामपंचायतीने मोहीम स्वरुपात घरपट्टी व पाणीपट्टी वसूल करून ९ महिन्यांच्या थकीत वेतानापैकी ७ महिन्यांच्या वेतनाच्या रक्कमा दिनांक २०/०५/२०२४ रोजी पर्यंत अदा करण्यात आलेल्या असून उर्वरित वेतन माहे जून अखेर पर्यंत अदा करणेची तजवीज ग्रामपंचायतीकडून ठेवण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुष्काळी परिस्थिती निवारणार्थ उपाययोजना करण्याबाबत

**(३९) * २३५३५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात उष्णतेचा पारा वाढत असून धरणातील पाण्याची पातळी कमी होत असल्यामुळे निर्माण झालेल्या पाणी टंचाईमुळे राज्यातील १८३७ हून अधिक गावे आणि ४३१७ हून अधिक वाड्यांवस्त्यांतील लोकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असल्याचे तसेच मागील वर्षाच्या तुलनेत टँकरच्या संख्येत २८ पटीने वाढ झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात ग्रामस्थांसह जनावरांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण झाले असून, टँकर लॉबीकडून निर्माण केली जाणारी कृत्रिम पाणीटंचाई तसेच नजीकच्या काळात पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र होण्याची जलसंपदा विभागाने व्यक्त केलेली भिती यानुषंगाने माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास शासनस्तरावर पाणीटंचाईच्या प्रश्नांवर बैठक घेण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्याच्या काही भागात ग्रामस्थासह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष हे कमी पर्जन्यमानामुळे खालावलेल्या धरणातील व जमिनीतील पाण्याच्या पातळीमुळे झालेली असून टॅकरलॉबी कडून कृत्रीम रित्या पाणी टंचाई निर्माण केलेली नाही. पाणी टंचाई निवारणार्थ शासनस्तरावर व विभागीय /जिल्हास्तरावर वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या आहेत.

(३) राज्यात दरवर्षी होत असलेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी केंद्र शासन व राज्यशासनाद्वारे जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत ५५ लिटर दरडोई दरदिवशी पाणी उपलब्ध करून देण्याकरीता नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच मंजूर टंचाई कृती आराखड्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन पाणी टंचाई निवारणार्थ विंधन विहिरी /कुपनलिका घेणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे, तात्पुरत्या पूरक नळ योजना घेणे,टँकरने /बैलगाडीने पाणीपुरवठा करणे,खाजगी विहीर अधिग्रहण करणे,विहीर खोल करणे/गाळ काढणे, बुडक्या घेणे इ. उपाययोजना राबविण्यात येत आहेत. राज्यातील टंचाई क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याची निकड विचारात घेऊन टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मान्यता देण्याचे अधिकार आवश्यकतेनुसार संबंधित उप विभागीय अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी यांना दिनांक २० एप्रिल, २०२२ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोग उपचारासाठी केमोथेरपी केंद्रे सुरु करणेबाबत

**(४०) * २३०७४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१९ च्या सर्वेक्षणामध्ये कर्करोगाच्या एक लाख १६ हजार रुग्णांची नोंद झाली असून सध्या ग्रामीण भागात कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याने आरोग्य विभागाने राज्यात कर्करोग निदान उपचारासाठी विविध योजना राबविण्याचा निर्णय घेवून टाटा कॅन्सर सेंटर सोबत सामंजस्य करार केला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने संपूर्ण राज्यात जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या रुग्णालयात डे-केअर केमोथेरपी केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सध्या अमरावती, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग, सातारा, नाशिक, पुणे, जळगांव, अकोला, वर्धा, रत्नागिरी, बीड व नंदुरबार अशा १३ ठिकाणी केमोथेरपीचे सेंटर सुरु करण्यात आले, परंतु उर्वरित २२ जिल्हयांमध्ये अद्याप यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्ण राज्यात जिल्हास्तरावर आरोग्य विभागाच्या रुग्णालयांत डे-केअर केमोथेरपी केंद्र सुरु करण्याकरीता शासनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत सहा जिल्हयांमध्ये डे-केअर सेंटर कार्यान्वित आहेत.

(४) उर्वरित जिल्हा रुग्णालय स्तरावर संबंधित जिल्ह्यात डे-केअर केमोथेरपी सेंटर सुरु करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामसडक योजनांच्या निविदा प्रक्रियांमध्ये तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी अनियमितता केल्याबाबत

**(४१) * २३९०६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील पंतप्रधान ग्रामसडक योजना/मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सन २०१७-२०१८ ते सन २०२२-२०२३ या कालावधीमध्ये पदाचा व अधिकारांचा गैरवापर करुन निविदा प्रक्रियेत अनियमितता केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी निविदा प्रसिद्धी नोटीसमधील एका कामात कंत्राटदारास बाद करून त्याच नोटीसमधील दुसऱ्या कामात त्याच कागदपत्राच्या आधारे त्याच कंत्राटदारास पात्र केलेले असून ई- निविदा असूनही त्यांच्या कार्यकाळातील सुमारे ९०% कामे ही अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा जादा दराने त्यांच्या मर्जीतल्या ठेकेदाराला देणेकरीता इतर कंत्राटदारांना पदाचा गैरवापर करून निविदाप्रक्रीयेतून बाहेर पडण्यास भाग पाडले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्याकरीता कोट्यवधीचा निधी खर्च करीत असताना तत्कालीन कार्यकारी अभियंता व त्यांच्या अधिनस्त असलेले उपअभियंता, कनिष्ठ अभियंता यांनी संगनमताने निधीचा मोठ्या प्रमाणात केलेला अपव्यय व सदर भागातील विकासकामांमधील त्रुटी, निकृष्ट दर्जा इत्यादी मुळे या भागातील आदिवासी जनतेत असंतोष असल्याने विशेष पथक व आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने तपास करण्याची मागणी नागरिकांसह लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अशा आशयाची तक्रार एप्रिल, २०२४ मध्ये वा त्या सुमारास प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

मुख्यमंत्री/प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांप्रमाणे/नियमानुसार न्यूनतम दराने प्राप्त देकाराच्या निविदा स्वीकृत करण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उध्दवत नाही.

-----------------

## राज्यात नवसंजीवनी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(४२) * २३३५४ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषित बालकांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी शासनामार्फत पोषण पुनर्वसन केंद्र चालविण्यात येत असून त्याद्वारे कुपोषित बालकांच्या आहार व आरा ेग्यावर विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कुपोषणामुळे गेल्या १५ वर्षात १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये जवळपास ५१ हजार बालकांचा मृत्यू झाल्याची व सन २०२३-२०२४ मध्ये जवळपास ३३ हजार ५०० कुपोषित बालके आढळून आल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून कुपोषणावर मात करण्यासाठी नवसंजीवनी योजना राबविण्यात येत असतानाही कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील कुपोषित बालकांची संख्या आटोक्यात येण्याकरीता तसेच राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यातील कुपोषणाचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत राबविण्यात येत असलेली नवसंजीवनी योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

सद्य:स्थितीत राज्यात जिल्हास्तरावर पोषण पुनर्वसन केंद्र (NRC) आरोग्य विभागामार्फत सुरु असून NRC मध्ये अंगणवाडीमार्फत दाखल करण्यात आलेल्या बालकांची संख्या १७९९ आहे. जी बालके दुर्धर आजारी आहेत अशा बालकांना NRC मध्ये दाखल करण्यात येते व त्यांना औषधोपचार केला जातो तसेच पोषण आहार देण्यात येतो.

(२) आरोग्य विभागाकडील मागील ५ वर्षातील बालमृत्यूची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ माहे ऑक्टोबर पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १९१८५ | १६९५१ | १६७१४ | १७१५० | ७४२४ |

राज्यातील मागील ५ वर्षातील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्षे | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | ५७५६३९९ | ५३०३६५९ | ३८६४१९ | ६६३२१ | १.१५ |
| २०२२-२३ | ५९३७४७९ | ५४५६२६० | ४०८८३८ | ७२३८१ | १.२२ |
| २०२१-२२ | ६२१६२६७ | ५६९६२४७ | ४४२६६४ | ७७३५६ | १.२४ |
| २०२०-२१ | ६०८२२०० | ५४७५८९५ | ५१९५१४ | ८६७९१ | १.४३ |
| २०१९-२० | ५७७१६५५ | ५०९०६८२ | ५७१००७ | १०९९६६ | १.९१ |

(३) राज्यात नवसंजीवनी योजनेंतर्गत ६ जिल्ह्यामध्ये २४ प्रकल्प असून त्याची कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

| वर्षे | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| २०२३-२४ | २५६३५६ | १८३९३४ | ५९३८६ | १३०३६ | ५.०९ |
| २०२२-२३ | २६२४७७ | १९१६३१ | ५७१४४ | १३७०२ | ५.२२ |

नवसंजीवन कार्यक्षेत्रातील सन २०२२-२३ व २०२३-२४ या दोन्ही वर्षाचे वरील आकडेवारीचे अवलोकन केले असता, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कुपोषणाचे प्रमाण कमी आहे.
कुपोषणाची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत:-

१) जन्मत: मुलाचे वजन कमी असणे (२५०० ग्रॅम पेक्षा कमी), (२) गरोदरपणातील आरोग्याची काळजी, (३) गरोदरपणातील रक्तक्षय व संस्थात्मक प्रसुती न होणे, (४) प्रसुती दरम्यान व प्रसुती पश्चात निर्माण झालेल्या समस्या, (५) मुलांचे दिर्घ आजार, (६) आजारपणातील उपचाराची तत्परता व गुणात्मकता, (७) अशुध्द पाणीपुरवठा, (८) आदिवासी लोकांमधील अनिष्ठ रुढी, परंपरा, व अंधश्रध्दा, (९) कमी उत्पन्न गट, (१०) कमी वयात गरोदरपणा, वारंवार गर्भधारणा, दोन प्रसुतीमधील कमी अंतर, (११) महिलांमध्ये आरोग्य व पोषण विषयक शिक्षणाचा अभाव, (१२) जनजागृतीचा अभाव.
४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येते. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.
(४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA), समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे नोंदणीकृत कामगारांना संसार उपयोगी साहित्य वाटपाच्या कार्यक्रमामध्ये चेंगराचेंगरी होऊन महिला कामगाराचा मृत्यू झाल्याबाबत

**(४३) * २३९५१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय
(१) नागपूर येथे राजकीय पक्षामार्फत आयोजित केलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत कामगारांना संसार उपयोगी साहित्य वाटप कार्यक्रमादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत एका वृध्द महिला कामगारांचा मृत्यू व काही कामगार गंभीररित्या जखमी झाल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यक्रमामध्ये नियोजनाचा व आवश्यक सोयी सुविधांचा अभाव तसेच कार्यक्रमाला गर्दी जमली असतानाही सभागृहात वेळेवर प्रवेश न दिल्याने कामगारांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी कामगारांच्या अकस्मात मृत्यूची नोंद केली असून कार्यक्रमाच्या आयोजकांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शाासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कार्यक्रमाच्या आयोजकावर व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच मृत कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना औषधोपचाराकरीता आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१)(२) (३) व (४)
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांमार्फत राज्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करुन त्यांना मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनेंतर्गत लाभ वाटप केले जाते. सदर योजनेच्या अनुषंगाने सुरक्षा संच व गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप करण्याकरीता राज्यातील विविध ठिकाणी शिबिर आयोजित करुन वस्तू वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार राज्यातील वेगवेगळया भागात शिबिरे आयोजित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींची निवेदने शासनास त्याचबरोबर मंडळास देखील प्राप्त होत असतात.

नागपूर क्षेत्रात सुरक्षा संच व गृहपयोगी वस्तू संच वाटपाकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी निवेदन दिले होते. तथापि, दिनांक ०८/०३/२०२४ ते ११/०३/२०२४ या कालावधीत सुरेश भट्ट सभागृह, रेशीम बाग, नागपूर या ठिकाणी झालेल्या शिबिराचे आयोजन हे कामगार विभागामार्फत पूर्वनियोजित होते. सदर शिबिराकरीता आवश्यक प्रशासकीय व्यवस्था, पोलीस प्रशासन, अग्निशमन दल व रुग्णवाहीका इ.बाबींचे नियोजन करण्यात आले होते.

दिनांक ०९/०३/२०२४ रोजी सदरचे शिबिर सुरु होण्यापूर्वी रांगेत उभ्या असणाऱ्या एक ६३ वर्षीय वृध्द महिला अचानक चक्कर येऊन पडल्याने त्यांना पुढील उपचारार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (GMC), नागपूर येथे दाखल केले. तथापि, सदर वृध्द महिलेचा ह्दयविकाराच्या झटक्याने मृत्यू झालेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगवी व घुगी (ता.शिरुर अनंतपाल, जि.लातूर) येथील जल जीवन मिशन योजनेतंर्गतची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४४) * २४२३२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सांगवी व घुगी (ता.शिरुर अनंतपाल, जि.लातूर) या गावांसाठी "हर घर जल, हर घर नल" या जल जीवन मिशन योजनेंतर्गत रुपये ५९ लाख ४४ हजार ९९ ची पाणीपुरवठा योजना मंजूर असून माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान सदर योजना पूर्ण होणे अपेक्षित असतानाही ठेकेदारांने जलकुंभाच्या कामास अद्याप सुरुवात केली नसल्याचे दिनांक १२ मे, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेच्या आर्थिक तरतूदीनुसार विहीर, पंपिग मशिनरी, पाईपलाईन व सांगवी गावासाठी २० हजार लिटर क्षमतेचे जलकुंभ व घुग्गी गावासाठी ३३ हजार क्षमतेचे जलकुंभ व विद्युतपुरवठा या बाबींसाठी मर्यादित निधी खर्च करावा असे बंधन घालण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाकडून कामास विलंब करणाऱ्या दोषी ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच सदर योजनांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जलकुंभासाठी जागा ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिली नसल्यामुळे जलकुंभाचे काम करता आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) काम मुदतीमध्ये पूर्ण झाले नसल्यामुळे संबंधित ठेकेदाराने मुदतवाढ मागितली होती, त्याप्रमाणे प्रती दिन रुपये २० इतका दंड करण्यात आलेला आहे.
(४) विलंब झालेला नाही. योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.